# निवासी वैद्यकीय अधिकारी पदाचा जाहिरात नमुना

**शासन अनुदानित मान्यता प्राप्त पदांमधील शेठ ताराचंद रामनाथ धमार्थ आयुर्वेदीक रुग्णालय, पुणे यांचे आस्थापनेवरील निवासी वैद्यकीय अधिकारी गट ब या संवर्गातील पद भरती करीता विहित पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**(१) पदसंख्या :**

१ पद ( निवासी वैद्यकीय अधिकारी - गट ब )

**(२) भरावयाच्या पदाचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबत :**

सदर पद एकच असल्याने अराखीव ( खुला ) संवर्गातून भरावयाचे आहे. (एकाकी पदास आरक्षण लागू नाही.)

**(३) अर्ज सादर करण्याची प्रक्रीया / कालावधी :**

जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांत विहित नमुन्यातील अर्ज पुर्ण भरुन सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सकाळी ०९ ते ०५ शनिवारी स. ९ ते १.३० व शनिवारी स. ९ ते १.३० या वेळेत वरील पत्त्यावर पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाहीत. पात्रताधारक इच्छुक उमेदवारांनी रु.१०००/- रोखीने भरुन रुग्णालयाच्या छापील विहित फॉर्मसोबत शैक्षणिक अर्हता अनुभव, शाळेचा दाखला इ. कागदत्राच्या सत्यप्रति सोबत जोडाव्यात.

**(४) अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक :**

संस्थेच्या कार्यालयात शुक्रवार दि. २६/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सर्व आवश्यकत्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आवेदनपत्र समक्ष अगर पोस्टाने पोहचतील अश्या बेताने पाठवावीत.

**(५) वेतनश्रेणी**

७ वे वेतन आयोगानुसार : S-20-56100-177500 सुधारित अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते.

**(६) पात्रता**

१) भारतीय नागरिकत्व व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

२) वयोमर्यादा

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय अमागास / मागासवर्गीय / आ.दु.घ. | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | प्राविण्यप्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी | | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | |
| **अर्ज करण्याची शेवटची तारीख** | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादा शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

**(७) शैक्षणिक अर्हता आणि अनुभव (शासन सेवा प्रवेश नियम, १९९० दि.२०.०८.१९९०नुसार)**

(१) **शैक्षणिक अर्हता -** Possess qualification mentioned in parts A, A-१, B and C of the Schedule to the Maharashtra Act or Indian Medicine Central Council Act. १९७० (४८ of १९७०)

(२) **अनुभव -** Have worked in an Ayurvedic recognized Government Hospital for purpose for not less than three years after acquiring the qualification mentioned in sub-clause ९.१ (१) And

(३) Have adequate Knowledge of Sanskrit, Hindi and English Language

(४) A person selected to the post shall have to get his name registered in the register maintained under the Maharashtra Act or under the Central Act, as the case may be, before joining the post unless he has already been so registered under the provisions of the said Act.

(५) प्राधान्यशील अर्हता - Preference may be given to any candidate who possess a post-graduate qualifications or administrative experience in a recognized Ayurvedic hospital or both

**(८) निवडप्रक्रिया :**

८.१. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही.

८.२. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची संख्या विहित कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमुद शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेव्दारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

८.३. मुलाखतीमध्ये किमान ४५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

८.४. सेवाभरतीबाबतची संपूर्ण प्रक्रिया निवासी वैद्यकीय अधिकारी सेवाप्रवेश नियम १९९० आणि तदनंतर शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

८.५. अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणा-या उमेदवाराची क्रमवारी (Ranking) शासनाचे विहित तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

**(८) आवश्यक कागदपत्रे (मुळ कागदपत्रे व स्वयं साक्षांकीत प्रतीसह)**

१. अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता)
२. वयाचा पुरावा (एस.एस.सी. किंवा नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका किंवा अन्य शासकीय प्राधिकरणाने दिलेला जन्मदाखला)
३. शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा
४. सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा
५. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा
६. अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र
७. पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा
८. पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा
९. अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा
१०. खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा
११. अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र
१२. एस.एस.सी. प्रमाणपत्रातील नावात बदल झाला असल्यास त्याचा पुरावा
१३. मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा
१४. हिंदी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा

१५. इंग्रजी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा
१६. संस्कृत भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा
१७. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन
१८. विहित अनुभव प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास)
१९. राज्य शासकीय कर्मचारी / खेळाडू/ दिव्यांग/ माजी सैनिक / मागासवर्गीय, आ.दु.घ, अनाथ यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र
२०. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक अठावीस) या अन्वये अथवा भारतीय वैद्यकीय केंद्रीय परिषद अधिनियम १९७० (१९७० चा अठ्ठेचाळीस) अन्वये नोंदणी प्रमाणपत्र

**(९) उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना**

(१) उक्त पदावर नियुक्ती होण्यासाठी निवड झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ किंवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम १९७० या अन्वये यापूर्वी स्वतःची नोंदणी केलेली नसेल तर, रुजू होण्यापूर्वी त्या अधिनियमांन्वये स्वतःची नोंदणी करण्याची आवश्यकता असेल.

(२) अर्जदार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (Domiciled) असणे आवश्यक आहे.

(३) अर्जदारास मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

(४) आपण कोणत्या प्रवर्गातील आहोत ते तपासूनच उमेदवारांनी त्या-त्या प्रवर्गात अर्ज भरावा.

(५) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अटी व इतर शासन निर्णय वित्त विभाग, संकीर्ण-१०००/ प्र.क्र.७०/सेवा-५, दिनांक ११.०८.२००० नुसार विहित अटी लागू राहतील. याबाबत प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी किंवा प्रत्यक्ष कागदपत्र तसपाणीच्या वेळी असणे अनिवार्य आहे.

(६) निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही वेळी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/ नियुक्ती कोणत्याही टप्पयावर रद्द करण्यात येईल.

(७) शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(८) शासनाने शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शासनमान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दि.१०.०८.२०१६ व शासन निर्णय दि.२९.०३.२०२५ नुसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (स्तर-१) योजना लागू राहील.तसेच, तद्नंतर शासनाने वेळोवेळी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालय व रुग्णालयाबाबत घेतलेले निर्णयानुसार संबंधित योजना लागू राहतील.

(९) मुलाखतीच्या वेळी प्रमाणपत्र तपासणी दरम्यान पात्रतेसंदर्भातील सर्व मुळ कागदपत्रे सादर न केल्यास शिफारस / नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

(१०) काही शंका असल्यास वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या हेल्पलाईन नंबर वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

(११) शासन अनुदानित आयुर्वेद रुग्णालयातील शासनमान्य पदाकरीता, वेतनश्रेणी, वयोमर्यादा, अनुभव आणि शैक्षणिक पात्रता व इतर अटी, शर्ती या महाराष्ट्र शासनाचे सेवा प्रवेश नियमानुसार लागू राहतील.

(१२) उमेदवारांचे वय, आवश्यक पात्रता आणि अनुभवाबाबत, अर्जाच्या शेवटच्या तारखेला पात्रता ठरवली जाईल

(१३) जे उमेदवार आधीच सेवेत आहेत त्यांनी त्यांचे अर्ज योग्य माध्यमाव्दारे (ना हरकत प्रमाणपत्रासह) सादर करावेत.

(१४) सदरील जाहिरात महाविद्यालयाच्या वेबसाईट www.tarachandhospital.in तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या www.muhs.ac.in वर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

**(१०) सेवाप्रवेशोत्तर शर्ती-**

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहीलः-

(१) हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

(२) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.), क्रमांकः मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंसं-२०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०२१ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा. नसल्यास नियुक्तीनंतर २ वर्षात सदर अर्हता प्राप्त न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

(३) नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवाराला महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक अठ्ठावीस) या अन्वये अथवा भारतीय वैद्यकीय केंद्रीय परिषद अधिनियम १९७० (१९७० चा अठ्ठेचाळीस) अन्वये नोंदणी करून घ्यावी लागेल. उक्त अधिनियमान्वये ज्या उमेदवारांनी आपली नोंदणी करुन घेतली आहे ते उमेदवार यास अपवाद राहतील.

(४) निवड झालेल्या उमेदवारास खाजगी व्यवसाय करण्यास बंदी असून, त्याऐवजी नियमाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देय होईल. तसेच, शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय लागू राहतील.

(५) सदर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराला तो/ती विवाहित आहे किंवा कसे? हे जाहिर करावे लागेल. विवाहित असल्यास, पुरुष उमेदवारांचे बाबतीत त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी आहेत किंवा कसे? आणि महिला उमेदवारांचे बाबतीत तिने पत्नी हयात असलेल्या पुरुषाशी विवाह केला किंवा कसे? याबाबत प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल. नियुक्तीनंतर असे प्रतिज्ञापत्र खोटे असल्याचे आढळल्यास, सेवेतून बडतर्फ करण्यात येईल.

(६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक क्रमांक-परिवी-२७१४/प्र.क्र३०२/कार्या.८, दिनांक २२ जून, २०२१ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार परिवीक्षा धोरणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

(७) संस्थेच्या व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती तसेच जाहिरात अधिकृत समजण्यात यावी.

**उप अधिक्षक,**
**शेठ ताराचंद रामनाथ धमार्थ आयुर्वेदीक रुग्णालय,**

**स्थळ : पुणे - ११**

दिनांक : ११/०९/२०२५